## निवडक



म्हापसा : विठ्ठल रखुमाई मंदिरात शतकोत्सव वर्षानिमित्त १०१ सामुहिक श्री समयनारायण महापुजा सोहळ्यात श्री विठ्ठल रखुमाई मूर्ती.

### विठ्ठल रखुमाई देवस्थानचा शतकोत्सव सोहळा उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. २९ :** क्षेत्र विठ्ठलवाडी म्हापसा येथील श्री विठ्ठल रखुमाई देवस्थानचा शतकोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात सुरुवात झाला. या शतकोत्सवानिमित्त मंदिराच्या प्रांगणात एकाच ठिकाणी एकाचवेळी १०१ सामुहिक समयनारायाण महापुजा उत्सव सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मंगलमय असा अनोखा १०१ यदमानांच्या अधिपत्याखाली महापूजा उत्सव साजरा करण्यात आला.

सकाळी १० वाजता श्री विठ्ठल रखुमाई व शहरातील सर्व देव देवतांना नारळ, विडा ठेऊन देवस्थानचे अध्यक्ष तुषार टोपले व त्यांची पत्नी शमा टोपले यांनी महासोहळ्याला सुरुवात केली. ज्येष्ठ पुरोहित राजू केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापुजा ब्रह्मवृंदानी पुजेत सहभाग घेऊन यजमानांना मर्गादर्शन करून साजरी केली.

देवस्थान समितीने भव्य असा मंडप उभारून १०१ सामुहिक श्री समय नारायण महापुजेची व्यवस्था केली होती. अत्यंत नियोजन बद्ध व शिस्तप्रिय असा महासोहळा साजरा करण्यात आला. प्रत्येक यजमानाला श्री समय नारायण देवाची मूर्ती भेट देण्यात आली. रात्री डॉ. राजू पेडणेकर व साथी कलाकारांचे सुश्राव्य भजन झाले. नंतर महाआरती झाली. देवस्थानचे पुरोहित सुनील नायक भटजीने श्री विठ्ठल रखुमाईची आकर्षक फुलांनी सजावट करून भाविकांचे लक्ष्य केंद्रीत केले होते.

### गोमंतक मराठा समाजाची कवळे येथे ४ मे रोजी बैठक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. २९ :** गोमंतक मराठा समाज, फोंडा तालुका समितीतर्फे रविवार दि. ४ मे रोजी संध्याकाळी ४ वाजता समाजबांधवांची खास बैठक श्री सरस्वती विद्यालय, कवळे येथे बोलाविण्यात आली आहे.

सदर बैठकीत समाजाच्या शताब्दी महोत्सवासंबंधी चर्चा करण्यासाठी सुभाष वेलिंगकर व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.तरी या बैठकीला पुरुष व महिला कार्यकारिणी तसेच समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन फोंडा तालुका समितीचे अध्यक्ष सुरेंद्र वळवईकर यांनी केले आहे.

### डॉ. नादिया रांजेल, कवी नारायण खोर्जुवेकर यांचा सत्कार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. २९ :** पोडवाळ खोर्जुवे येथील श्री साई मंदिराच्या सभागृहात माजी आमदार प्रमुख पाहुणे ग्लेन सौजा टिकलो यांच्या उपस्थितीत डॉ. नादिया रांजेल (समाजसेविका) व नारायण खोर्जुवेकर (कवी) यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त ग्राम सत्कार करण्यात आला. १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून ग्रामस्थ परिवारातर्फे तसेच डॉ. बाबासाहेब भीमराव खोर्जुवे युवासंघातर्फे हा समारंभ केला होता. व्यासपीठावर माजी आमदार ग्लेन सोजा टिकलो, झेडपी सभासद मनीषा नाईक, बस्तोडा ग्रामपंचायतचे सरपंच रणजीत उसगावकर, सत्कारमूर्ती डॉ. नादिया रांजेल, सत्कारमूर्ती नारायण खोर्जूवेकर (कवी, गीतकार, काव्य गायक) पंच सदस्य यशवंत परवार समाजसेवक डेविड राजेंल, प्रमुख वक्ते मिलिंद माटे (उपसंचालक कला व संस्कृती संचालनालय पणजी गोवा), सूत्रसंचालक माजी बँक अधिकारी गोपीनाथ परवार यांची उपस्थिती होती. त्यांनी खोर्जुवेकरांचा भावस्पर्शी शब्दातून परिचय करून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजापुरते मर्यादित नसून ते सर्व भारतीय समाजाचे उद्धारकर्ते आहेत. त्यांनी भोगलेल्या जीवनाची कथा मिलिंद यांनी मर्मस्पर्शी शब्दातून मांडली. सर्व प्रेक्षकांना त्यांनी नेहमी वाचन करण्याचा व भिमाला समजून घेण्याचा सल्ला दिला. त्यांच्या विचारांनी प्रेक्षक प्रभावित झाले. प्रमुख आमदार ग्लेन सोजा टिकलो यांनी डॉक्टर आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेविषयी आदर व व्यक्त केला. त्यांच्या हस्ते विद्यार्थी सत्यम यशवंत परवार, प्रियदर्शनी यशवंत परवार, प्रतीक परवार, संजीवनी सत्यवान परवार, रिया दशरथ परवार, बारावी पास –कनिष्का कृष्णा परवार, शाश्मिता शाबल परवार, विशाखा लक्ष्मण परवार, बीएस्सी पास–सलोनी सत्यवान परवार, एम एस्सी– शेजल विश्वनाथ परवार या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या समारंभाचे आभार कुमारी सलोनी सत्यवान परवार हिने मानले.


# चेन्नईसाठी आज ‘करो या मरो’


## पंजाब किंग्जविरुद्ध महत्त्वपूर्ण सामना | सामना जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न

**चेन्नई, दि. २९ :**

इंडियन प्रिमिअर लीग (आयपीएल) २०२५ मध्ये खूपच खराब कामगिरी करणाऱ्या पाच वेळा विजेत्या चेन्नई सुपर किंग्ज आता स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या मार्गावर आहेत. आता यापुढे होणारा प्रत्येक सामना त्याच्यासाठी करा किंवा मरो अशी परिस्थिती आहे. जर त्यांनी एक सामना गमावला तर ते प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडतील. उद्या बुधवारी (दि. ३०) सीएसके चेपॉक येथे पंजाब किंग्ज विरुद्ध खेळणार आहे. प्लेऑफच्या दृष्टीनेही पंजाब किंग्जसाठी हा सामना खूप महत्त्वाचा आहे. अशा परिस्थितीत, दोन्ही संघ हा सामना जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील.

चेन्नईसाठी सर्वात निराशाजनक गोष्ट म्हणजे चेपॉक येथील घरच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यात त्यांना अपयश आले, जे त्यांचा दीर्घकाळापासून बालेकिल्ला आहे. चेन्नईचा संघ प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आपल्या धुसर आशा जिवंत ठेवण्यासाठी स्पर्धेतील तिसरा विजय मिळविण्यासाठी उत्सुक असेल. कोपराच्या दुखापतीमुळे संघाबाहेर पडलेल्या ऋतुराज गायकवाड यांच्याकडून कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर महेंद्रसिंग धोनीसारखा करिष्माई खेळाडूही संघात उत्साह निर्माण करण्यात अपयशी ठरला आहे.







या सामन्यात काही खेळाडूंमध्ये एक मनोरंजक स्पर्धा पाहायला मिळते.’ पॉवरप्लेमध्ये अर्शदीप सिंगचा सामना करताना चेन्नईचा युवा खेळाडू आयुष म्हात्रे दमदार कामगिरी करण्याचा प्रयत्न करेल. मधल्या षटकांमध्ये सर्वात मनोरंजक लढत शिवम दुबे आणि युजवेंद्र चहल यांच्यात होण्याची अपेक्षा आहे. चहल उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि चेन्नईचा मधलाक्रम त्याच्या आव्हानाचा कसा सामना करतो हे पाहणे मनोरंजक असेल.

प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी पंजाबला चांगली सुरुवात करून दिली आहे आणि त्यांना रोखण्याची जबाबदारी डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमदवर असेल. कर्णधार श्रेयस अय्यरच्या रूपात पंजाबला एक असा फलंदाज सापडला आहे जो संघाचा सूत्रसंचालक म्हणून चांगली भूमिका बजावू शकतो. चेन्नईचा फिरकी गोलंदाज नूर अहमदला त्यांच्याविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल.

धोनी ४३ वर्षांचा असूनही, सामन्याचा शेवट सकारात्मक पद्धतीने करण्यास सक्षम आहे, परंतु विजय शंकर, दीपक हुडा आणि राहुल त्रिपाठी सारख्या भारतीय फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल. रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन आणि मथिशा पाथिराना यांच्या गोलंदाजीतील संघर्षांचाही चेन्नईला फायदा झाला नाही. पंजाबकडे मार्को जॅन्सेनच्या रूपात एक चांगला अष्टपैलू खेळाडू आहे, तर गोलंदाजीची धुरा अर्शदीप आणि चहल यांच्याकडे असेल.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

**चेन्नई सुपर किंग्ज :** शेख रशीद, आयुष म्हात्रे, दीपक हुडा, सॅम कुरन, रवींद्र जडेजा, देवाल्ड ब्रेविस, शिवम दुबे, एमएस धोनी (यष्टीरक्षक/कर्णधार), नूर अहमद, खलील अहमद, मथिशा पाथिराना.

**पंजाब किंग्स :** प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंह, श्रेयस अय्यर (कर्णधार), जोश इंग्लिस (विकेटकीपर), नेहल वढेरा, शशांक सिंह, ग्लेन मैक्सवेल, अजमतुल्लाह उमरजई, मार्को जानसन, अर्शदीप सिंह, युजवेंद्र चहल.

**चेन्नईचे पारडे जड**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्जच्या आतापर्यंत हे दोन्ही संघ एकूण ३१ वेळा एकमेकांसमोर आले आहेत. यापैकी १६ सामने सीएसकेने जिंकले आहेत. तर पंजाब किंग्जने १५ सामने जिंकले आहेत. त्यामुळे सीएसकेचे पारडे जड आहे.



# शिरगाव जत्रेत प्लास्टिक वापर टाळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

▶ **सरकारी प्राथमिक शाळेचा उपक्रम : २००० कागदी पिशव्या तयार : १ मे रोजी होणार वितरण**

**डिचोली, दि. २९ :** शिरगाव येथील श्री देवी लई राईच्या जत्रेनिमित्त शिरगाव सरकारी प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी पालकांच्या सहकार्यांनी यावर्षीही प्लास्टिक मुक्त जत्रा करण्याचा संकल्प करून सुमारे २००० कागदी पिशव्या वितरण करण्याचा संकल्प केला आहे. एक मे रोजी विशेष रॅलीचे आयोजन करून येथील दुकानदार व घरोघरी या पिशव्या वाटण्यात येणार आहेत.

मुख्याध्यापिका शिवानी तेली तसेच शिक्षिका माया शिंगाडे अलिषा बुगडे तसेच शाळेतील वीस विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन तसेच पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी एकत्र येऊन या पिशव्या तयार केल्या असून या अभिनव उपक्रमाचे बरेच कौतुक झाले होते.

यावर्षीही आम्ही हा उपक्रम राबवला असून प्लास्टिक मुक्तीचा संदेश देताना पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्व भाविकांनी दुकानदारांनी सहकार्य करावे हा आमचा हेतू असल्याचे शिवानी तेली यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी अतिशय आपुलकीने या पिशव्या तयार केलेल्या असून एक मे रोजी त्यांचे वितरण शिरगावात होणार आहे. गेल्या वर्षी या मुलांनी व शिक्षकांनी मिळून काही कागदी व कपड्याच्या पिशव्या वितरण करून प्लास्टिक मुक्तीचा संदेश दिला होता. यावर्षी २००० पेपर बॅग तयार करून त्या वितरणाचा संकल्प करताना प्लास्टिक मुक्त जत्रा साजरी करावी यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# टी–१० टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत गोवा संघाला जेतेपद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. २९ :** गोवा टी–१० टेनिस बॉल क्रिकेट एसोसिएशन व टी–१० टेनिस बॉल क्रिकेट एसोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय क्रिकेट स्पर्धा कांपाल पणजी येथे आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेला मुख्य उद्‌घाटक म्हणून माजी मेयर शीतल नाईक, उदय म्हाळशेकर, अध्यक्ष दयेश वेंगुर्लेकर, नितीन लींगुडकर, अभिषेक सिंग, चंदन डोंगरीकर, श्याम आयीर, रामदास वरक, साहील नाईक, शर्मिला नाईक, दिनेश धुरी, संतोष झोरे उपस्थित होते.

गोवा संघाने पहली फलंदाजी करत ८ षटकात ११२ धावा केल्या यात गुरू आरोसकर याने ४५ धावाची खेळी केली. तोच अंतिम सामन्यात सामनावीर ठरला. गोवा संघाने कर्नाटक संघाचा ३५ धावांनी पराभव केला. या स्पर्धेत पुनाजी कळंगुटकर उत्कृष्ट फलंदाज तर संदेश ठाकूर उत्कृष्ट गोलंदाज ठरला. मालिकावीर म्हणून कर्नाटकचा मुरली याला मिळाले. या स्पर्धे दरम्यान सतरा वर्षांखालील व १९ वर्षांखालील राष्ट्रीय पातळीवर पातळीवर चमकलेले मुलांचा प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी अखिल गोवा बीजेपी अध्यक्ष दामु नाईक, पणजीचे आमदार सिद्धार्थ कुंकळ्येकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सुंदर अशा स्पर्धेची सांगता राष्ट्रगीताने झाली.





**पणजी : अखिल भारतीय टी–१० टेनिस क्रिकेट स्पर्धेत शीतल नाईक व उदय मडकईकर यांच्या हस्ते चषक स्वीकारताना गोव्याचा कर्णधार प्रणय गावकर. सोबत अध्यक्ष दयेश वेंगुर्लेकर, नितीन लिंगुडकर, रामदास वरक, श्याम आमीर व अभिषेक सिंग.**

# ऋषभ पंतला स्लो ओव्हर रेटसाठी २४ लाखांचा दंड

**लखनऊ, दि. २९ :**



लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंतला स्लो ओव्हर रेटसाठी २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंना, ज्यामध्ये इम्पॅक्ट प्लेअरचा समावेश आहे, त्यांना ६ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के रक्कम, जे कमी असेल ते दंड भरावा लागेल.

२७ एप्रिल रोजी मुंबईत मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात झालेल्या सामन्यात निर्धारित वेळेत पूर्ण षटके न टाकल्याबद्दल लखनऊवर हा दंड ठोठावण्यात आला आहे. या हंगामात लखनऊचा षटकांचा वेग दुसऱ्या क्रमांकावर आहे.

आयपीएल–१८ च्या ४६ व्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सचा ६ गडी राखून पराभव केला. अरुण जेटली स्टेडियमवर दिल्लीने ८ विकेट गमावून १६२ धावा केल्या. रविवारी, कृणाल पंड्या आणि विराट कोहली यांच्या अर्धशतकांच्या जोरावर बंगळुरूने १९ व्या षटकात ४ गडी गमावून लक्ष्य गाठले.

लखनऊने १० सामन्यांत ५ विजय आणि ५ पराभव पत्करले. हा संघ १० गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी एलएसजीला उर्वरित चारही सामने जिंकावे लागतील. या हंगामात स्लो ओव्हर रेटसाठी दंड आकारण्याची ही आठवी वेळ आहे. एलएसजी आणि राजस्थान रॉयल्स यांना दोनदा, मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांना प्रत्येकी एकदा दंड ठोठावण्यात आला आहे.

# १४ वर्षांच्या वैभवने रचला इतिहास

## आयपीएसमध्ये ३५ चेंडूत शतक करणारा सर्वात तरुण फलंदाज

**जयपूर, दि. २९ :**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या शतकामुळे राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्स (जीटी) वर ८ गडी राखून विजय मिळवला. जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर, राजस्थानने २१० धावांचे लक्ष्य १६ व्या षटकात २ गडी गमावून पूर्ण केले. प्रथम फलंदाजी करताना जीटीने ४ गडी गमावून २०९ धावा केल्या.

सोमवारचा दिवस वैभव सूर्यवंशीच्या नावावर विक्रमांचा दिवस होता. तो आयपीएल आणि टी–२० मध्ये अर्धशतक आणि शतक करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. वैभवने ३५ चेंडूत शतक झळकावले, आयपीएलमध्ये कोणत्याही भारतीय खेळाडूने केलेले हे सर्वात कमी चेंडू आहेत. त्याने आयपीएलमधील दुसरे सर्वात जलद शतक ठोकले आणि यशस्वीसोबत राजस्थानसाठी सर्वात मोठी भागीदारीही केली.

राजस्थान रॉयल्सने त्यांचे संयुक्त सर्वात जलद संघ शतक झळकावले. संघाने काल ७.४ षटकांत आपले शतक पूर्ण केले. २०२३ मध्येही राजस्थानने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध ७.४ षटकांत १०० धावा केल्या होत्या. वैभव सूर्यवंशीने आयपीएलमध्ये एका डावात सर्वाधिक षटकार मारण्याच्या भारतीय फलंदाजाच्या ११ षटकारांच्या विक्रमाची बरोबरी केली. २०१० मध्ये मुरली विजयने चेन्नई सुपर किंग्जकडून राजस्थान रॉयल्सविरुद्ध ११ षटकार मारले होते. वैभव राजस्थानकडून एका डावात सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडूही ठरला. त्याने २०१८ मध्ये बंगळुरुविरुद्ध संजू सॅमसनचा १० षटकारांचा विक्रम मोडला.





राजस्थानने गुजरात टायटन्स (जीटी) विरुद्ध आयपीएलमध्ये सर्वाधिक धावांचा पाठलाग केला. संघाने २१० धावांचा पाठलाग १५.५ षटकांत पूर्ण केला. यापूर्वी, कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) ने २०२३ मध्ये अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध २०५ धावांचे लक्ष्य गाठले होते.

करीम जन्नतने आयपीएल २०२५ मधील सर्वात महागडा षटक टाकला. त्याने त्याच्या आयपीएल पदार्पणाच्या षटकात ३० धावा दिल्या. वैभव सूर्यवंशीने त्याच्या षटकातील ६ चेंडूत ६ चौकार मारले. ज्यामध्ये ३ षटकार आणि ३ चौकारांचा समावेश होता. करीमने आयपीएलमधील कोणत्याही गोलंदाजाने टाकलेला पहिला सर्वात महागडा षटक.

इशांत शर्माने (३६ वर्षे २३८ दिवस) राजस्थान रॉयल्सचे सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांना गोलंदाजी दिली. दोघांचेही एकूण वय ३७ वर्षे १५३ दिवस आहे. २००७ मध्ये जेव्हा इशांत शर्माने आयपीएलमध्ये पदार्पण केले तेव्हा वैभवचा जन्म झाला नव्हता. इशांत शर्माच्या षटकात त्याने २८ धावा काढल्या.

**१. वैभव आयपीएलमध्ये अर्धशतक करणारा सर्वात तरुण खेळाडू**

वैभव सूर्यवंशी आयपीएलमध्ये अर्धशतक करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याने केवळ १४ वर्षे आणि ३२ दिवसांच्या वयात अर्धशतक झळकावले. कर्णधार रियान पराग दुसऱ्या स्थानावर आहे, त्याने २०१९ मध्ये १७ वर्षे १७५ दिवसांच्या वयात अर्धशतक ठोकले होते.

**२. वैभवचे या हंगामातील सर्वात जलद अर्धशतक**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएल–१८ मधील सर्वात जलद अर्धशतक झळकावले. त्याने फक्त १७ चेंडूत चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर निकोलस पूरनची पाळी येते. त्याने हैदराबादविरुद्ध १८ चेंडूत अर्धशतक झळकावले.

**३. राजस्थानने आपला सर्वोच्च पॉवरप्ले स्कोअर बनवला**

राजस्थान रॉयल्सने त्यांचा सर्वोच्च पॉवरप्ले स्कोअर केला. संघाने एकही विकेट न गमावता ८७ धावा केल्या. यापूर्वी, २०२३ मध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्ध, संघाने पहिल्या ६ षटकांत एका विकेटच्या मोबदल्यात ८५ धावा केल्या होत्या.

**४. वैभवने दुसरे सर्वात जलद अर्धशतक झळकावळे**

राजस्थान रॉयल्ससाठी वैभव सूर्यवंशीने दुसरे जलद अर्धशतक झळकावले. त्याने फक्त १७ चेंडूत हे यश मिळवले. २०२३ मध्ये, यशस्वी जयस्वालने कोलकाताविरुद्ध १३ चेंडूत अर्धशतक झळकावले.

# प्रतिका ठरली वनडेत सर्वात जलद ५०० धावा करणारी क्रिकेटपटू

**नवी दिल्ली, दि. २९ :**

मंगळवार २९ एप्रिल रोजी त्रिकोणीय सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाची फलंदाज प्रतिका रावलने इतिहास रचला आहे. वनडे क्रिकेटमध्ये सलग पाचव्या वेळा तिने ५० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. ती दुसरी महिला भारतीय क्रिकेटर बनली आहे, जिने वनडे क्रिकेटमध्ये सलग पाच वेळा अर्धशतक झळकावले आहे. प्रतिकाने वनडेमध्ये ५०० धावा करून एक मोठा विक्रम तिच्या नावावर केला आहे.

प्रतिका रावलने स्मृती मानधना सोबत मिळून ८३ धावांची भागीदारी रचली. त्यानंतर स्मृती ५४ चेंडू ३६ धावा करून बाद झाली. प्रतिका रावलने तिच्या वनडे करिअरच्या ५०० धावा पूर्ण करून इतिहास रचला. प्रतिका रावलने या शानदार पारीमध्ये आंतरराष्ट्रीय वनडे क्रिकेटमध्ये ५०० धावा पूर्ण केल्या. ती सर्वात वेगाने ५०० धावा करणारी महिला खेळाडू ठरली आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात सुद्धा प्रतिकाने ६२ चेंडूत नाबाद ५० धावांची पारी खेळली होती,





यासाठी तिला सामनावीर हा पुरस्कार देण्यात आला होता. त्या सामन्यात भारताने ९ विकेट्सने विजय मिळवला होता. प्रतिकाने ८ डावात ५०० धावा पूर्ण केल्या आहेत.

साऊथ आफ्रिका विरुद्ध प्रतिका रावलने ९१ चेंडूत ७८ धावा केल्या, या दरम्यान तिने एक षटकार आणि सात चौकार झळकावले. या मालिकेआधी तिने तीन अर्धशतक आयर्लंड विरुद्ध राजकोटच्या मैदानावर झळकावले होते. प्रतिका रावलने आयर्लंड महिला संघाविरुद्ध १५ जानेवारी २०२५ रोजी १५४ धावांची रेकॉर्ड पारी खेळली होती. त्याआधी पहिल्या दोन सामन्यात तिने ८९ आणि ६७ धावा केल्या होत्या. २७ एप्रिल पासून सुरू झालेल्या या मालिकेचा अंतिम सामना ११ मे रोजी खेळला जाणार आहे. सर्व संघ बाकीच्या दोन संघांशी दोन–दोन सामने खेळतील.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 237 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .